# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र.१५६१/२०२१/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.सैय्यद अतिक सैय्यद याकुब, रा.घर नंबर १३३, गल्ली नंबर ७, बापु गांधी नगर, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक | कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक. |

**विवेचन**

उपरोक्त अपिलासंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन (स्टॅम्प) नंबर ९७०६४/२०२० चे आदेश दिले असून सदरहु पिटीशन मध्ये पॅरा एफ मध्ये असे नमूद आहे की, एम ई पी एस रुल्स ३ (१) ते (५) यात नमूद नुसार संस्थेत वाद असल्यास ॲप्रोल थांबविण्याचे कोणतेही अधिकार आपले कार्यालयास नाही. तरी जमहूर हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज जमहूर नगर, मालेगांव जि.नाशिक चे बोगस पदाधिकारी यांचे शेडयुल्ड वर नाव नाही तरी त्यांनी जे प्रस्ताव सादर केले त्यांना मान्यता देता येते याची माहिती मिळावी व त्याबाबतचा पुरावा मिळावा. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २४/०३/२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेशित केले होते.

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्री.शिवराम बोटे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्रीमती वैशाली झनकर यांनी अपिलार्थी यांनी दिनांक १०/०५/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त

झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शासन परिपत्रक दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२. सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), जिल्हा परिषद, नाशिक, श्री.शिवराम बोटे यांचा दि.२९/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये लेखी खुलासा आयोगास सादर केला आहे. सदर खुलाश्यात नमूद केले आहे की, अपिलार्थी यांचा दि.०६/०४/२०२१ रोजीचा माहिती अर्ज होता. सदरची माहिती ही मानीव जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक (माध्यमिक शिक्षण विभाग) जि.प.नाशिक यांचे ताब्यात असल्याने सदरचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणेबाबत त्यांना दि.०९/०४/२०२१ अन्वये कळविले होते. त्यानुसार त्यांनी माहिती अशी माहिती उपलब्ध नाही, असे कळविल्याने अपिलार्थीस दि.०४/०५/२०२१ च्या पत्रान्वये अशी माहिती उपलब्ध नाही, असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले असून सदर पत्राची प्रत प्रत्यक्ष दिलेली आहे. त्याबाबतची अपिलार्थी यांची पोच घेतली आहे. तसेच प्रथम अपील निर्णयात देखील सदर बाब नमूद केलेली आहे. त्यामुळे माझा खुलासा मान्य करण्यात येवून माझे विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येवू नये ही नम्र विनंती.

३. प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), जिल्हा परिषद, नाशिक, श्री.शिवराम बोटे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दि.०४/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदर माहिती उपलब्ध नाही, असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर विहित मुदतीत कळविले आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय असल्याने त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्रीमती वैशाली झनकर यांना उपरोक्त आदेशान्वये खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. मात्र त्यांनी अद्यापही आयोगास कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

तरी आता प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्रीमती वैशाली झनकर यांनी प्रथम अपिलावर विलंबाने सुनावणी घेतली आहे. त्यामुळे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दि.१२/१२/२००७ चा भंग केला असल्याची खातरजमा झाल्यास त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), जिल्हा परिषद, नाशिक, श्री.शिवराम बोटे यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने सदर खुलासा मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्रीमती वैशाली झनकर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

यांनी प्रथम अपिलावर विलंबाने सुनावणी घेतली आहे. त्यामुळे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दि.१२/१२/२००७ चा भंग केला असल्याची खातरजमा झाल्यास त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रती,

१. श्री.शिवराम बोटे (तत्कालीन जन माहिती अधिकारी) कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), जिल्हा परिषद, नाशिक, ता.जि.नाशिक.
२. श्रीमती वैशाली झनकर (तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, ता.जि.नाशिक.

प्रतिलिपी- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.
यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनांनुसार आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश सर्व संबंधितांवर बजावून त्याची दिनांकित पोच आयोगास सादर करावी.

---

जावक क्र. आो-२७०० 30 OCT 2023